| अ.नं. | पारितोषिकाचे नांव | रक्कम | पात्रता | अट |
|---|---|---|---|---|
| १. | श्री.नंदकुमार नाईक शिष्यवृत्ती | वार्षिक शिष्यवृत्ती | श्री वारणा विभाग शिक्षण संचलित शिक्षण संस्थेत शिक्षण घेणारे व वारणा कारखान्याचे सभासदांचे पाल्य | पाल्य संज्ञेचा अर्थ कारखान्याचेसंचालक मंडळ ठरवते. |
| २. | कै.भगवान श्रीपती जाधव पारितोषिक | वार्षिक पारितोषिक | बी.ए. भाग ३ या परीक्षेत प्रथम येणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थीनींसाठी | य.च.वारणा महाविद्यालय बी.ए.-३ परीक्षेत प्रथम |
| ३. | कै.गणेश बापूजी जोशी पारितोषिक | वार्षिक पारितोषिक | बी.ए. भाग ३ मध्ये मराठी विषय घेऊन प्रथम येणारा विद्यार्थी / विद्यार्थीनी | य.च.वारणा महाविद्यालयात बी.ए. भाग ३ मध्ये मराठी विषय घेऊन प्रथम येणारा विद्यार्थी / विद्यार्थीनी |
| ४. | प्राचार्य डॉ.आर.डी.शिंगटे स्मृती पुरस्कार | वार्षिक पारितोषिक | बी.एस्सी. भाग ३ मध्ये किमान ७५% गुण मिळवून प्रथम क्रमांक | य.च.वारणा महाविद्यालयात रसायनशास्त्र विषय घेऊन बी.एस्सी.भाग-३ मध्ये प्रथम येणारा विद्यार्थी / विद्यार्थीनी |
| ५. | कै.वसंत रामचंद्र औंधकर पारितोषिक | वार्षिक पारितोषिक | बी.कॉम.भाग-३ मध्ये किमान ६०% गुण मिळवून वर्गात प्रथम येणारा विद्यार्थी / विद्यार्थीनी | य.च.वारणा महाविद्यालयात बी.कॉम.भाग-३ किमान ६०% गुण सर्वप्रथम विद्यार्थी |
| ६. | कै.अनुसया बापूसाहेब बंडगर पारितोषिक | प्रथम क्र.५००/-<br>द्वितीय क्र.३००/-<br>तृतीय क्र.२००/- | इ.११ वी व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेले विद्यार्थी / विद्यार्थीनी | इ.११ वी व्यावसायिक अभ्यास-क्रमाकडे प्रवेश घेणाऱ्या इ.१० वी मध्ये प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण झालेले गुणानुक्रमे पहिले तीन विद्यार्थी / विद्यार्थीनी |

सदर पारितोषिकासाठीचे अर्ज संबंधित विद्यार्थ्यांनी प्राचार्यांच्या सूचनेनुसार कार्यालयाकडे सादर करावेत.

अर्जासोबत गुणपत्रकाची खरी नक्कल व जेथे प्रवेश घेतला आहे त्या संस्थेचे बोनाफाईड सर्टिफिकेट जोडावे.

**टिप: ही पारितोषिके विद्यार्थ्यांना अधिक प्रेरित करण्यासाठी दिली जातात.**

**महाविद्यालयात प्रवेश घेण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी आपल्याकडील सर्व गुणपत्रकांच्या, दाखल्यांच्या 'झेरॉक्स' जादा प्रती स्वत:कडे ठेवाव्यात.**

## ८. फी सवलती व शिष्यवृत्त्या

**सरकारी फी सवलती:**

सरकारी नियमानुसार मिळणाऱ्या सर्व सवलती व शिष्यवृत्त्या आमच्या महाविद्यालयात उपलब्ध आहेत. सर्व विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती अर्ज करण्यापूर्वी विद्यार्थ्यांचे राष्ट्रीयकृत बँकेत सेव्हिंग अकौंट (खाते) असणे आवश्यक आहे. सदरचे बँक खाते आधार लिंक असणे आवश्यक आहे.

अ) **ई.बी.सी. फी सवलत –** ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे गतवर्षी वार्षिक उत्पन्न रु. २,००,०००/– पेक्षा कमी आहे. त्यांना ही फी सवलत मिळू शकते. त्यासाठी प्रवेश घेताना अर्ज व उत्पन्नाचे दाखले जोडावे लागतात.

ब) **स्वातंत्र्य सैनिक फी सवलत व शिष्यवृत्ती –** ज्या विद्यार्थ्यांच्या वडीलांना भारत सरकारकडून स्वातंत्र्य सैनिक सन्मानपत्र मिळाले आहे त्यांना ही फी सवलत व शिष्यवृत्ती दिली जाते.

क) **भारत सरकार शिष्यवृत्ती (एस.सी., एन.टी., एस.बी.सी., एस.टी. व ओ.बी.सी.)** भारत सरकाने घोषित केलेल्या मागासवर्गीय जाती जमातीतील विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाते. पालकांचे वार्षिक उत्पन्न मर्यादा – एस.सी. प्रवर्गासाठी रुपये २,००,०००/– व इतर प्रवर्गासाठी रुपये १,००,०००/– पर्यंत

ड) **प्राथमिक शिक्षकांच्या मुला–मुलींना मिळणारी फी सवलत –** ज्या विद्यार्थ्यांचे आई / वडील किंवा दोघे, प्राथमिक शिक्षक आहेत त्यांना ही सवलत मिळते. त्यासाठी योग्य तो अर्ज भरुन द्यावा लागतो.

ई) **माजी सैनिकांच्या मुलांना फी सवलत –** माजी सैनिकांच्या मुलांना फी सवलत मिळते. त्यासाठी योग्य तो अर्ज, पात्रता दाखल्यासह, महाविद्यालयात भरुन द्यावा लागतो.

फ) **राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती –** ही शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना दहावी व बारावीमध्ये मिळालेल्या गुणांवर दिली जाते. या शिष्यवृत्तीची निवड परस्पर शिक्षण संचालक, पुणे यांच्याकडे होते.

ग) **अपंग विद्यार्थी शिष्यवृत्ती –** ही शिष्यवृत्ती मा.समाजकल्याण अधिकारी अपंग कल्याण विभाग, जिल्हा परिषद, यांचेकडून मिळते. त्यासाठी ठराविक नमुन्यात अर्ज भरुन देणे आवश्यक आहे.

**शिष्यवृत्त्या:**

१) **अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती:**

कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील मुस्लिम, बौद्ध, पारशी, शीख व जैन समाजातील विद्यार्थी–विद्यार्थीनी सदर शिष्यवृत्तीस पात्र राहतील. मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत शिष्यवृत्ती दिली जाते.

२) **सेंटर सेक्टर शिष्यवृत्ती:**

१२ वी कला, वाणिज्य व विज्ञान वर्गात मार्च/एप्रिल परीक्षेत विशेष गुणवत्ता प्राप्त करुन पुढील वर्षी बी.ए., बी.कॉम. व बी.एस्सी. भाग – १ वर्गात नियमित प्रवेश घेणे आवश्यक आहे. मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत शिष्यवृत्ती दिली जाते.

३) **शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती:**

१२ वी कला, वाणिज्य व विज्ञान वर्गात मार्च/एप्रिल परीक्षेत ७५% पेक्षा जादा गुण प्राप्त करुन पुढील वर्षी बी.ए., बी.कॉम. व बी.एस्सी. भाग–१ वर्गात नियमित प्रवेश घेणे आवश्यक आहे.

**४) गणित व भौतिकशास्त्र या मधील प्रज्ञावान विद्यार्थी–विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती:**

१२ वी विज्ञान वर्गात मार्च/एप्रिल परीक्षेत गणित व भौतिकशास्त्र या विषयात किमान ६५% गुण प्राप्त करुन बी.एस्सी. भाग–१ वर्गात नियमित प्रवेश घेणे आवश्यक आहे.

**५) राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती:**

इ.१० वी मध्ये ७५% पेक्षा जादा गुण मिळणे आवश्यक आहे. मा.सामाजिक न्याय विभाग, कोल्हापूर यांचेमार्फत शिष्यवृत्ती दिली जाते. एस.सी., एन.टी. व एस.बी.सी. विद्यार्थी–विद्यार्थीनी पात्र राहतील.

**६) आम आदमी शिष्यवृत्ती योजना:**

कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयात शिकत असणारे मागासवर्गीय व इतर मागासवर्गीय विद्यार्थी–विद्यार्थीनी पात्र राहतील. सदर शिष्यवृत्ती मा.तहसिलदार, पन्हाळा यांचेमार्फत दिली जाते.

**७) हिंदी शिष्यवृत्ती:**

१२ वी कला वर्गात मार्च/एप्रिल परीक्षेत हिंदी विषयात ७५% गुण प्राप्त करुन बी.ए. भाग – १ वर्गात नियमित प्रवेश घेणे आवश्यक आहे. मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत शिष्यवृत्ती दिली जाते. अर्ज ऑनलाईन भरावा लागतो. विद्यार्थ्यांचे राष्ट्रीयकृत बँकेत सेव्हींग खाते असावे व ते आधार लिंक असावे.

**८) विद्यार्थी सहाय्य निधी**

विद्यार्थ्यांची वर्तणूक, नियमितपणा व अभ्यासातील प्रगती यांचा विचार करुन शक्य ते आर्थिक सहाय्य या निधीतून दिले जाईल. हा सहाय्य निधी फक्त वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठीच उपलब्ध आहे

**९) गौरवाचे मानकरी**

आपण बुद्धिवंत, गुणवंत आणि उद्यमशील आहात ही तुमची प्रज्ञा जतन करण्याची तीव्र इच्छा स्वर्गीय तात्यासाहेबांनी अखेरपर्यंत जोपासली. त्यांच्या कार्यातूनच श्री वारणा विभाग शिक्षण मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर हे 'शैक्षणिक शिल्प' या वारणाकाठी परिवर्तनाचा व 'नव मानव' साकारण्याचा ध्यास घेऊन आकारले व नावारूपास आले आहे.

अशा या सरस्वती मंदिरात, तुमच्या सारखे सृजनशील विद्यार्थी, अधिकाधिक प्रमाणात विद्या उपासनेकरिता आले पाहिजेत अशी आमची इच्छा आहे. यासाठी तुम्हांला प्रेरणा देण्यास तात्यासाहेब कोरे पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट सदैव तत्पर आहे. ट्रस्टच्या वतीने जून १९९८ पासून गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांसाठी खालील योजनेचा शुभारंभ झाला आहे. क्र.३ च्या पारितोषिकाबाबत महाविद्यालयात गुणानुक्रमे पहिले तीन विद्यार्थी सदर पारितोषिकासाठी विद्यार्थ्यास किमान ८५% गुण आवश्यक आहेत.

| अ.नं. | अपेक्षित गुणवत्ता | रक्कम | पात्रता | अट |
|---|---|---|---|---|
| १. | इ.१० वी परीक्षेत प्रथम<br>द्वितीय<br>तृतीय | ७५०<br>५००<br>३५० | वारणा खोऱ्यातील विविध विद्यालयात शिकत असलेले विद्यार्थी | य.च. वारणा महाविद्यालयात प्रवेश |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २. | इ.१२ वी परीक्षेत प्रथम<br>द्वितीय<br>तृतीय | २०००<br>१५००<br>१००० | इ.१२ वी कला, वाणिज्य, शास्त्र विद्याशाखेत सर्वाधिक गुण मिळविणारे विद्यार्थी | य.च. वारणा महाविद्यालयाचा विद्यार्थी/विद्यार्थिनी |

## ११. शिस्त व उपस्थिती विषयक नियम

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (नियमावली) महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९५ (५) अन्वये – विद्यार्थ्यांच्या शिस्त पालनाच्या व योग्य वर्तणुकीच्या संदर्भांत तयार करण्यात आलेली नियमावली.

**महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यास खालील नियम बंधनकारक असतील.**

१. शिस्तीचा एक भाग म्हणून विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सण – समारंभ व महत्त्वाचे दिवस साजरे करण्यासाठी सर्व समारंभांना उपस्थित राहणे आवश्यक आहे.

२. अ) कायद्यातील नियमानुसार आवश्यक तेवढी किमान उपस्थिती पूर्ण करण्यासाठी विद्यार्थी सर्व तास, प्रात्यक्षिके, परिसंवाद वगैरेंना नियमितपणे उपस्थित राहणे आवश्यक आहे.
ब) प्राचार्य / संस्था प्रमुखांच्या परवानगीशिवाय कोणीही तीन दिवसापेक्षा जास्त गैरहजर राहणार नाही.

३. शिक्षण संस्थेच्या मालमत्तेचे कोणत्याही प्रकारे नुकसान होणार नाही, याची काळजी घेणे हे विद्यार्थ्यांवर बंधनकारक आहे.

४. अ) वर्गातील इतर विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी आणि महाविद्यालयातील इतर कर्मचारी यांच्याशी विद्यार्थी जबाबदारीने वागतील.
ब) महाविद्यालयातील सर्व शैक्षणिक व सांस्कृतिक समारंभामध्ये विद्यार्थी योग्य तऱ्हेने आणि मित्रत्वाने वागतील.

५. महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी प्रत्येक सोमवार व गुरुवार या दिवशी महाविद्यालयाने ठरविलेल्या गणवेशात उपस्थित राहणे आवश्यक आहे.
क) शैक्षणिक सहली, युवक महोत्सव आणि इतर सांस्कृतिक कार्यक्रम जेंव्हा आयोजित केले जातील, तेंव्हा त्यामध्ये विद्यार्थी विधायकपणे भाग घेऊन सदर सहल / कार्यक्रम पूर्ण करण्यासाठी आपले शिक्षक, अधिकारी यांना योग्य ते सहकार्य करतील.
ड) महाविद्यालयातील ग्रंथालय (वाचनालय) / प्रयोगशाळा / अभ्यासिका आणि इतर सामाजिक सोयींचा योग्य वापर करुन इतरांना त्रास होणार नाही व मालमत्तेचेही नुकसान होणार नाही, याविषयी विद्यार्थी दक्षता घेतील.

६. वसतिगृहातील विद्यार्थी, संस्था प्रमुखांनी केलेल्या वसतिगृहाच्या नियमांचे पूर्ण पालन करतील.

७. जे विद्यार्थी सामुदायिक रजा, अशिष्ट वर्तन, गुंडगिरी, मारामारी, गैरप्रकार किंवा गुन्हेगारी प्रकरणामध्ये सापडले जातील त्यांना योग्य ती शिक्षा केली जाईल.

**८. राज्य सरकारचे रॅगिंग विरोधी विधेयक आणि या विषयी संस्थेने वेळोवेळी केलेले नियम हे विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहतील तसेच महाविद्यालयामध्ये रॅगिंग करणार नाही असे प्रतिज्ञापत्र विद्यार्थी व पालक यांनी महाविद्यालयात प्रवेश घेते वेळी देणे बंधनकारक राहील.**

९. कॉलेजमधील कमीत कमी ८०% तासांना व प्रात्यक्षिकांना उपस्थित असल्याशिवाय त्या विद्यार्थ्यांना (EBC) फी सवलत मिळणार नाही व वार्षिक परीक्षेचा अर्ज विद्यापीठाकडे / बोर्डाकडे पाठविला जाणार नाही. परीक्षेचा अर्ज व फी भरल्यानंतर नियमित उपस्थिती व समाधानकारक प्रगती होत राहणे आवश्यक आहे. असे न झाल्यास विद्यापीठाकडे / बोर्डाकडे पाठविलेला परीक्षा अर्ज, प्राचार्य केंव्हाही रद्दबातल ठरवू शकतात.

१०. एन.सी.सी. किटस् (संपूर्ण साहित्य) सुस्थितीत व वेळेवर परत केलेच पाहिजे.

११. वर्ग सुरु असताना महाविद्यालयाच्या आवारात रेंगाळणे, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या कामात अडथळा आणणे, आपल्या वर्तनाने आपल्या वर्गाला व इतर वर्गांना उपसर्ग करणे, हे गंभीर दखलपात्र गुन्हे समजले जातील.

१२. महाविद्यालयाच्या प्रतिष्ठेला बाधा येईल असे वर्तन विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयाच्या परिसरात किंवा बाहेरही घडता कामा नये.

१३) महाविद्यालयातील सर्व मालमत्तेचा उपयोग विद्यार्थ्यांनी काळजीपूर्वक करावा. विद्यार्थ्यांकडून मालमत्तेचे नुकसान झाल्यास संबंधित विद्यार्थ्यांकडून नुकसान भरपाई घेण्यात येईल.

१४) महाविद्यालयाने वाहने ठेवण्यासाठी जागा निश्चित केली आहे तेथेच विद्यार्थ्यांनी आपली वाहने ठेवावीत. वाहनांच्या आवाजाने इतरांना त्रास होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

**१५) प्रत्येक विद्यार्थ्याला ओळखपत्र (Idetity Card) दिले जाईल व ते नेहमी विद्यार्थ्यांजवळ असणे आवश्यक आहे.महाविद्यालयाचे प्राध्यापक किंवा कर्मचारी यांनी मागणी केल्यास ते दाखविले पाहिजे.**

१६) गैरवर्तन, गैरहजेरी, असमाधानकारक प्रगती इत्यादी संबंधीच्या तक्रारी आल्यास, संबंधित विद्यार्थ्यांस कडक शासन केले जाईल. अक्षम्य वर्तनाबद्दल प्राचार्य कोणत्याही विद्यार्थ्याचा प्रवेश केंव्हाही रद्द करु शकतात.

१७) प्राचार्यांनी वेळोवेळी जाहीर केलेल्या सूचना व नियम सूचना फलकावर लावण्यात येतील. सर्व विद्यार्थ्यांनी सूचना फलक नियमित पहावा. सूचना व नियम यांचे पालन करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांवर राहील. सूचना व नियम फलकावर लावल्यानंतर पुन: वर्गात कळविले जातीलच असे नाही.

१८) परीक्षेच्या काळात गैरप्रकार करणे कायद्यानुसार गुन्हा आहे.

१९) कुलगुरुंच्या अधिकारास कोणत्याही प्रकारे बाधा न आणता महाविद्यालयातील शिस्तीच्या यथायोग्य पालनासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व अधिकारांचा वापर प्राचार्य करतील. प्राचार्यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

२०) **महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य शासन व विद्यापीठाच्या आदेशानुसार महिला तक्रार निवारण समिती कार्यरत आहे.**

## १२. महाविद्यालयीन परीक्षा विषयक सूचना

### अ) कनिष्ठ महाविद्यालय

१. पहिल्या सत्रात पहिली सहामाही परीक्षा घेतली जाते.

२. दुसऱ्या सत्रात दुसरी सहामाही परीक्षा घेतली जाते.

३. इ.११ वी, १२ वी साठी शारीरिक शिक्षण परीक्षा घेतली जाते.

४. वरील सर्व परीक्षांना विद्यार्थ्यांनी हजर असले पाहिजे.

५. प्रत्येक विषयाचे २ गृहपाठ व २ घटक चाचण्या घेतल्या जातात.

६. इ.११ वी चा निकाल तयार करताना गृहपाठ, घटक चाचणी, सहामाही परीक्षा क्र.१ व सहामाही परीक्षा क्र.२ या परीक्षांचे गुण व वर्गातील दैनंदिन हजेरी विचारात घेतली जाते.

७. इ.१२ वी साठी सर्व विद्या शाखांना पूर्व परीक्षा अनिवार्य आहे याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

८. इ.११ वी व १२ वी शास्त्र शाखेत रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, गणित व जीवशास्त्र या विषयांस लेखी परीक्षेत किमान २५% गुण आवश्यक आहेत.

### ब) वरिष्ठ महाविद्यालय

१. बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. भाग १, २ व ३ या वर्गांच्या सत्र परीक्षा शिवाजी विद्यापीठाच्या नियमानुसार होतील.

२. बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. भाग ३ या वर्गातील विद्यार्थ्यांचे विषयवार अंतर्गत मूल्यमापन केले जाईल.त्यासाठी १० गुण आहेत. अंतर्गत मूल्यमापनासाठी उपस्थिती व सहभाग अनिवार्य आहे.

३. बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. भाग १ च्या विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठाने शारीरिक शिक्षण योजना सक्तीची केली आहे. या योजनेमार्फत घेतली जाणारी परीक्षा १० गुणांची असते. हे गुण एखाद्या विषयात उत्तीर्ण होण्यासाठी गरज पडल्यास विचारात घेतले जातात.

## १३. महाविद्यालय परिसर : सोयी व सुविधा

महाविद्यालयाचा परिसर भव्य व रम्य असून यात महाविद्यालयाच्या विज्ञान आणि कला-वाणिज्य शाखांसाठी स्वतंत्र अशा प्रशस्त इमारती, स्वतंत्र ग्रंथालय, सुसज्ज प्रयोगशाळा, उत्कृष्ट बोटॅनिकल गार्डन, प्रशस्त क्रीडांगण, बहुपयोगी सांस्कृतिक भवन, उत्तम उपहारगृह आणि उत्कृष्ट क्रीडा संकुल तसेच सर्व सोयीनीयुक्त अशी विद्यार्थी विद्यार्थिनीसाठी स्वतंत्र वसतिगृहाची आणि मेसची सोय आहे.

### A) ग्रंथालय

महाविद्यालयाच्या ग्रंथालयाचे कामकाज स्वतंत्र व प्रशस्त अशा इमारतीत चालते. ग्रंथालयामध्ये विविध विषयावरील ४९००० पेक्षा अधिक पुस्तके असून सर्व क्रमिक पुस्तके, संदर्भ ग्रंथ, नियतकालिके व दैनिके विपुल प्रमाणात उपलब्ध आहेत. ग्रंथालयामध्ये विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका, विद्यार्थी वाचन कक्ष, विद्यार्थिनी वाचन कक्ष,प्राध्यापक वाचन कक्ष, संदर्भ ग्रंथ दालन, पुस्तक देवघेव कक्ष असे विविध कक्ष असून, ग्रंथालयामार्फत विद्यार्थ्यांसाठी रात्र अभ्यासिका चालविली जाते. (ग्रंथालयाची वेळ : सकाळी ८ ते सायं. ४ अशी आहे.)

**ग्रंथालयातील विशेष सुविधा–**

१. प्रत्येक विद्यार्थ्यांस ग्रंथालय कार्डावर आठवड्यातून एक पुस्तक दिले जाते. हे पुस्तक विद्यार्थ्यांला जास्तीत जास्त १५ दिवस वापरता येते.

२. विद्यार्थ्यांना त्यांच्या ओळखपत्रावर त्यांच्या मागणीनुसार एक पुस्तक ग्रंथालयातच वाचनासाठी दिले जाते.

३. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना 'बुक बँक' योजनेनुसार अभ्यासक्रमावरील विविध पुस्तके दिली जातात.

४. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी एच.एस.सी. बोर्डाच्या व विद्यापीठीय परीक्षांच्या प्रश्नपत्रिकेचे विविध संच, ग्रंथालयात ठेवले असून विद्यार्थ्यांना त्यांच्या ओळखपत्रावर हे संच दिले जातात.

B) **क्रीडा विभाग (जिमखाना)**

महाविद्यालयाचे प्रशस्त असे क्रीडांगण आहे. विविध देशी–विदेशी खेळांच्या आवश्यक साधनांनी क्रीडा विभाग समृद्ध असून खेळाडूंना शारीरिक शिक्षण आणि विविध खेळांचे शास्त्रशुद्ध मार्गदर्शन करण्यासाठी दोन तज्ज्ञ क्रीडा शिक्षक उपलब्ध आहेत. महाविद्यालयाची जिमखाना नियमावली असून ती जिमखाना कार्यालयात पहावयास मिळेल.

C) **उपहारगृह (कॅन्टीन)**

महाविद्यालयाच्या उपहारगृहासाठी प्रशस्त व सुसज्ज इमारत उपलब्ध आहे. उपहारगृहात स्वच्छ, ताजे आणि सकस पदार्थ वाजवी दरात उपलब्ध होतात. उपहारगृहाची वेळ सकाळी ८ ते सायंकाळी ७ पर्यंत असते.

D) **सायकल बँक योजना**

कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयात शिकत असणाऱ्या गरीब व होतकरु विद्यार्थिनींना महाविद्यालयाकडून वर्षभर वापरासाठी सायकल मोफत दिली जाते. महाविद्यालयात ८४ सायकलींची सुविधा उपलब्ध आहे.

E) **झेरॉक्स**

विद्यार्थ्यांना वाजवी दरात झेरॉक्स प्रती उपलब्ध व्हाव्यात यासाठी महविद्यालयाने झेरॉक्स मशीनची सोय ग्रंथालयात केलेली आहे.

F) **इंटरनेट सुविधा**

कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयात शिकत असणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत इंटरनेट सुविधा दिली जाते.

## १४. महाविद्यालयीन विविध उपक्रम

A) **आजीवन अध्ययन व विस्तार कार्य**

महाविद्यालयामध्ये या विभागांतर्गत विविध सर्टिफिकेट कोर्स राबविले जातात.

B) राष्ट्रीय छात्रसेना

राष्ट्रीय छात्रसेना ही देशातील युवकांची सर्वात मोठी अशी शिस्तबद्ध संघटना असून या संघटनेच्या उपक्रमातून युवकांच्या शिस्त, चारित्र्य, सेवाभाव, देशभक्ती, धैर्य, साहस, बंधुभाव इ. गुणांची जोपासना केली जाते. एन.सी.सी. 'सी' सर्टिफिकेट धारकासाठी सैन्यदलामध्ये अधिकारी पदांच्या जागा राखीव

असतात. शिवाय एन.सी.सी. छात्रसैनिकांना आर्मी, नेव्ही, एअर फोर्स, सीमा सुरक्षा दल, तटरक्षक दल, औद्योगिक सुरक्षा दल, पोलिस खाते, विविध शासकीय सेवा आणि खाजगी क्षेत्रांमध्ये नोकरी भरतीच्या वेळी प्राधान्य देण्यात येते.महाविद्यालयामध्ये मुलांच्या व मुलींच्या एन.सी.सी. शिक्षणाची सोय असून शारीरिकदृष्ट्या सुदृढ आणि लष्करी शिक्षणाची आवड असणाऱ्या विद्यार्थी – विद्यार्थिनींना हे शिक्षण घेता येते. आपल्या महाविद्यालयातील छात्रसेनेत मुलांच्यासाठी १०४ व मुलींच्यासाठी ५० जागा उपलब्ध आहेत. गेल्या अनेक वर्षापासून आमच्या महाविद्यालयातील अनेक विद्यार्थी – विद्यार्थिनींची दिल्ली येथील ‘ प्रजासत्ताक दिन’ संचलनासाठी अभिनंदनीय निवड होत आलेली आहे.

**C) राष्ट्रीय सेवा योजना**

वरिष्ठ महाविद्यालयातील समाजसेवेची आवड असणाऱ्या २०० विद्यार्थी–विद्यार्थिनींना या योजनेत सहभागी होता येते. या योजने अंतर्गत वर्षभर विविध कार्यक्रम राबविले जातात व द्वितीय सत्रात या योजनेतर्फे विद्यार्थी–विद्यार्थिनींचे विशेष श्रमसंस्कार शिबीर भरविण्यात येते. शिबीरात भाग घेतल्या बद्दलचे प्रमाणपत्र देण्यात येते. तसेच या योजनेत दोन वर्षे पूर्ण काम केल्यानंतर स्वयंसेवकांना शिवाजी विद्यापीठामार्फत प्रमाणपत्रे दिली जातात.

**D) कमवा–शिका योजना**

महाविद्यालयातील गरीब आणि होतकरू अशा किमान १० विद्यार्थ्यांना महाविद्यालय परिसरात अर्धवेळ काम करून अर्थार्जनाची संधी श्री वारणा विभाग शिक्षण मंडळाकडून उपलब्ध करून दिली जाते. यासाठी प्रवेश घेतल्यानंतर इच्छूक व गरजू विद्यार्थ्यांनी प्राचार्यांच्या मार्फत शिक्षण मंडळाशी संपर्क साधावयाचा आहे.

**E) माजी विद्यार्थी संघ (अल्युम्नी असोसिएशन)**

आमच्या महाविद्यालयात शिकत असणाऱ्या बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. भाग – ३ व एम.ए., एम.एस्सी.२ या वर्गातील विद्यार्थ्यांकडून विद्यापीठीय परीक्षेच्या वेळी, माजी विद्यार्थी संघाचे फॉर्मस भरुन घेतले जातात. सोबत एक फोटोही घेतला जातो. वर्षातून किमान एकदा माजी विद्यार्थी संघाचा कार्यक्रम आयोजित केला जातो. रु. ५०/– भरुन सभासद व्हावे.

**F) विद्यार्थी कल्याण**

महाविद्यालयात विद्यार्थी कल्याण उपक्रमांतर्गत खालील योजना राबविल्या जातात.

१. विद्यार्थी सहाय्य निधी
२. कमवा–शिका योजना
३. विद्यार्थी विमा
४. गौरवात्मक शिष्यवृत्त्या
५. अपंग विद्यार्थ्यांच्यासाठी सोयी व सुविधा

**G) विद्यार्थी विमा**

महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांकडून फी तक्त्यामध्ये निर्देशित केल्याप्रमाणे हप्ता घेऊन विद्यार्थ्यांना विमा संरक्षण उपलब्ध करुन दिले जाते. सदर विमा योजनाची मुदत एक वर्ष असून या मुदतीत विद्यार्थ्यांचा अपघाती मृत्यू झाल्यास त्याच्या पालकांना नियमानुसार आर्थिक लाभ दिला जातो. तसेच अपघातामुळे विद्यार्थ्यांस अपंगत्व आल्यास विमा कंपनीच्या नियमानुसार आर्थिक मदत दिली जाते. ही विद्यार्थी विमा योजना विद्यार्थी कल्याण योजने अंतर्गत राबविली जाते.

H) **कात्रण काचपेटी**

विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी विविध नोकरी आणि व्यवसाय संधी व विविध करिअर्स बद्दलची माहिती देणारी वर्तमानपत्रातील व इतर नियतकालिकांमधील कात्रणे व पत्रके नियमितपणे काचपेटीत लावली जातात. विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यावा.

I) **अग्रणी महाविद्यालय**

शिवाजी विद्यापीठाने २००५-०६ पासून य.च. वारणा महाविद्यालयास 'अग्रणी महाविद्यालय' ( Lead College) दर्जा दिलेला होता. आपल्या महाविद्यालयासह परिसरातील एकूण दहा महाविद्यालयाचा यात समावेश केलेला होता. अग्रणी महाविद्यालय योजनेखाली शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, प्रशिक्षण असे विविध उपक्रम वर्षभर राबविले जातात.

शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून विद्यापीठाने ठरवून दिलेल्या महाविद्यालयाच्या नेतृत्वाखाली अग्रणी महाविद्यालयाचे उपक्रम यशस्वीपणे राबविले जात आहेत.

J) **प्लेसमेंट सेल**

महाविद्यालयातील बी.ए., बी.कॉम. व बी.एस्सी. भाग तीन मधील विद्यार्थ्यांकरिता विविध नामवंत कंपन्यांच्या परिसर मुलाखती आयोजित केल्या जातात. या अनुषंगाने विद्यार्थ्यांकरिता व्यक्तिमत्व विकास, मुलाखतीचे तंत्र इत्यादी विषयावर कार्यशाळांचे आयोजन केले जाते. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना नोकरीची संधी मिळते.

K) **रेमिडिअल कोचिंग (Remedail Coaching )**

२००५-०६ या शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्यासाठी रेमिडिअल कोचिंग सुरु झालेले आहे. यामध्ये विद्यार्थ्यांच्यासाठी १. इंग्रजी संभाषण कला, २. कम्युनिकेशन स्किल्स, ३. व्यक्तिमत्व विकास, ४. स्पर्धा परीक्षेसाठी मार्गदर्शन अशा विविध विषयांवर मार्गदर्शन केले जाते. त्याच बरोबर आवश्यक ते शैक्षणिक साहित्य (पुस्तके व नोटस्) मोफत पुरविले जाते. महाविद्यालयातील सर्व मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या विद्यार्थी - विद्यार्थिनींना या उपक्रमास उपस्थित राहणे अनिवार्य आहे. महाविद्यालयात स्वतंत्र भाषा प्रयोगशाळा (लँग्वेज लॅब) आहे. तिचा लाभही विद्यार्थ्यांनी घ्यावा.

L) **सेवा विस्तार कार्यक्रम**

सेवा विस्तार कार्यक्रमांतर्गत महाविद्यालयामध्ये वर्षभर सातत्याने अनेक उपक्रम सादर केले जातात. त्यातून विद्यार्थ्यांची सामाजिक बांधिलकी आणि त्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासासाठी आवश्यक ती उपक्रमशीलता प्रगट व्हावी ही अपेक्षा असते. एड्स प्रतिबंधात्मक प्रशिक्षण कार्यशाळा, वैद्यकीय आणि रक्तदान शिबीरे, युवा कौशल्य विकास, पर्यावरण जाणीव जागृती - इत्यादी कार्यक्रम प्रत्यक्ष राबविले जातात. त्यामध्ये विद्यार्थी - विद्यार्थिनींना उत्स्फूर्त सहभाग घेणे आवश्यक आहे. महाविद्यालयात स्वतंत्र भाषा प्रयोग शाळा (लँग्वेज लॅब) आहे. तिचा लाभ ही विद्यार्थ्यांनी घ्यावा.

**M) वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम**

शैक्षणिक वर्षात १५ ऑगस्ट, ५ सप्टेंबर, २ ऑक्टोबर, २६ जानेवारी तसेच गुणवंत व होतकरु विद्यार्थ्यांचा सत्कार, वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ, सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन इत्यादी मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात. या शिवाय महापुरुषांच्या जयंती आणि पुण्यतिथींच्या निमित्त विविध कार्यक्रमांचेही आयोजन करुन त्यांना आदरांजली वाहिली जाते. अशा राष्ट्रीय, पारंपारिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा सहभाग अत्यावश्यक आहे.

**N) कन्स्लटंसी सर्व्हिस**

महाविद्यालयात पाणी व माती परीक्षण करण्याची सोय उपलब्ध आहे. तसेच व्हर्मी कंपोस्ट, कीड नियंत्रण, आयकर संबंधी मार्गदर्शनही उपलब्ध आहे.

**O) विश्ववारणा अर्धवार्षिक राष्ट्रीय संशोधन पत्रिका** (Vishwa Warana National Research Journal) महाविद्यालय विश्ववारणा अर्धवार्षिक राष्ट्रीय संशोधन पत्रिका (जानेवारी व जुलै) प्रकाशित करते. त्याचा **ISSN No.**२३९४-८८०९ हा असून त्यामध्ये महाविद्यालयातील संशोधक व इतर संशोधक यांचे शोध निबंध तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून तपासून घेऊन प्रकाशित केले जातात.

**P) विनय कोरे करिअर अकॅडमी**

वरिष्ठ महाविद्यालयात शिकत असणारे व PSI,STI,राज्यसेवा, बँकींग, स्पर्धा परीक्षा (IBPS), केंद्रीय प्रशासकीय सेवा या मधील विविध पदासाठी पात्रता परीक्षा देणाऱ्या सर्व विद्यार्थी - विद्यार्थिनींना अध्यापन व मार्गदर्शन केले जाते. सदर मार्गदर्शन वर्गास तज्ज्ञ मार्गदर्शक नियुक्त केलेले असून सुसज्ज ग्रंथालयाची सोय आहे.तसेच स्वतंत्र अध्यापन कक्ष, अभ्यासिका (२४ X ७) आदी सोयी उपलब्ध आहेत.

**Q) महाविद्यालयाचे संकेत स्थळ (Website)**

महाविद्यालयाची अधिकृत वेबसाईट www.ycwm.ac.in ही असून त्यामध्ये प्रवेश प्रक्रिया, प्रवेश फी, माहितीपत्रक, विविध समिती, विविध विभाग, विविध मंडळे इत्यादी महाविद्यालयातील विविध उपक्रमांची माहिती यांचा समावेश असून त्यासाठी विद्यार्थ्यांनी वेबसाईट पहावी.

## १५. महाविद्यालयाची विविध मंडळे व विद्यार्थी संसद:

महाविद्यालयामध्ये पुढील मंडळे कार्यरत आहेत.

१. जिमखाना (वरिष्ठ महाविद्यालय)
२. जिमखाना (कनिष्ठ महाविद्यालय)
३. राष्ट्रीय छात्र सेना (विद्यार्थी)
४. राष्ट्रीय छात्र सेना (विद्यार्थिनी)
५. राष्ट्रीय सेवा योजना (वरिष्ठ महाविद्यालय)
६. शैक्षणिक सहली
७. विद्यार्थी - प्राध्यापक प्रबोधिनी
८. सांस्कृतिक मंडळ (वरिष्ठ महाविद्यालय)
९. सांस्कृतिक मंडळ (कनिष्ठ महाविद्यालय)
१०. वाङ्मय मंडळ
११. विविध सामाजिक मंडळे
१२. वाणिज्य मंडळ
१३. विज्ञान मंडळ
१४. भूगोलशास्त्र मंडळ
१५. निसर्ग परिचय मंडळ
१६. वक्तृत्व-वादविवाद स्पर्धा मंडळ
१७. नियोजन मंडळ
१८. वारणा वार्षिक मंडळ
१९. तक्रार निवारण मंडळ
२०. भित्तीपत्रक निर्मिती मंडळ

२१. आजीवन अध्ययन व विस्तार कार्य

२२. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व व्यवसाय नियोजन मंडळ

वरील मंडळाच्या प्रमुखांची यादी महाविद्यालयाच्या सूचना फलकावर लावली जाते. विद्यार्थ्यांनी मंडळाच्या प्रमुखांशी संपर्क साधावा. सर्वच विद्यार्थ्यांनी विविध सर्व उपक्रमात सहभागी होणे अपेक्षित आहे.

**विद्यार्थी संसद**

महाविद्यालयामध्ये सन २०२०-२१ या वर्षाचे विद्यार्थी संसद (स्टुडन्स् कौन्सिल) शिवाजी विद्यापीठ व महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार व नियमानुसार स्थापन करण्यात येईल.

**✻ महाविद्यालयाच्या वेळा ✻**

✻ वरिष्ठ महाविद्यालय : कला, वाणिज्य व विज्ञान शाखा : सकाळी ७.३० ते दुपारी १२.३०

.........................................................................................................

✻ कनिष्ठ महाविद्यालय : कला, वाणिज्य, विज्ञान
व एच.एस.व्ही.सी. शाखा : सकाळी ११.०० ते सायं. ०५.००

.........................................................................................................

पदव्युत्तर अभ्यासक्रम (एम.ए.) : मराठी, इतिहास, अर्थशास्त्र
दुपारी ०३.०० ते सायंकाळी ०५.००

(एम.एस्सी.) : १) गणित : सकाळी ०८.०० ते १२.००
२) रसायनशास्त्र : सकाळी ०८.०० ते ०३.००

अधिक माहिती महाविद्यालयाची वेबसाईट www.ycwm.ac.in वर वेळोवेळी प्रसिद्ध केली जाईल.

**शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१**

| | | | |
|---|---|---|---|
| प्रथम सत्रारंभ | - दि.२२-०६-२०२० | प्रथम सत्रसमाप्ती | - दि. - -२०२० |
| द्वितीय सत्रारंभ | - दि. - -२०२० | द्वितीय सत्रसमाप्ती | - दि. - -२०२० |

## शैक्षणिक दिनदर्शिका २०२०-२०२१

| | | |
|---|---|---|
| प्रवेश प्रक्रिया | ............................ | २२ जून २०२० प्रथम व द्वितीय सप्ताह |
| प्रथम सत्रारंभ | ............................ | २२ जून २०२० |
| IQAC बैठक | ............................ | तृतीय सप्ताह |
| प्राचार्यांची अभिभाषणे | ............................ | जून २०२० तृतीय सप्ताह व चतुर्थ सप्ताह |
| अध्यापन प्रारंभ | ............................ | दि. २२ जून २०२० |
| विद्यार्थी संसद निवड | ............................ | -- |
| स्वातंत्र्य दिन | ............................ | १५ ऑगस्ट २०२० |
| शिक्षक दिन व शैक्षणिक सप्ताह | ............................ | प्रथम सप्ताह सप्टेंबर २०२० |
| विविध मंडळाचे उद्‌घाटन समारंभ | ............................ | सप्टेंबर २०२० |
| म.गांधी जयंती, प्रश्नमंजुषा स्पर्धा आणि व्यसनमुक्ती सप्ताह प्रारंभ | ............................ | २ ऑक्टोबर २०२० |
| सहामाही परीक्षा | ............................ | ऑक्टोबर २०२० |
| ऑक्टोबर – विद्यापीठ परीक्षा | ............................ | ऑक्टोबर चतुर्थ सप्ताह |
| प्रथम सत्र समाप्ती | ............................ | |
| द्वितीय सत्रारंभ | ............................ | |
| विविध मंडळाचे कार्यक्रम | ............................ | डिसेंबर २०२० |
| प्रजासत्ताक दिन | ............................ | २६ जानेवारी २०२१ |
| वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ | ............................ | जानेवारी २०२१ चतुर्थ सप्ताह |
| शैक्षणिक सहली | ............................ | फेब्रुवारी २०२१दुसरा सप्ताह |
| इयत्ता १२ वी : बोर्ड परीक्षा | ............................ | फेब्रुवारी–मार्च २०२१ |
| इयत्ता ११ वी : महाविद्यालय परीक्षा | ............................ | मार्च २०२१ |
| वरिष्ठ महाविद्यालय प्रात्यक्षिक परीक्षा | ............................ | मार्च २०२१ पासून |
| वरिष्ठ महाविद्यालय अभ्यासक्रम समाप्ती | ............................ | मार्च २०२१ दुसरा / तिसरा सप्ताह |
| विद्यार्थ्यांचे शंका निरसन | ............................ | मार्च २०२१ तिसरा सप्ताह |
| विद्यापीठ परीक्षा (लेखी) | ............................ | मार्च २०२१ चौथा सप्ताह |
| IQAC आढावा बैठक व अहवाल | ............................ | एप्रिल दुसरा सप्ताह २०२१ |
| वारणा वार्षिक प्रकाशन | ............................ | एप्रिल (चौथा सप्ताह) |
| शैक्षणिक वर्ष समाप्ती | ............................ | |

# परीक्षा निकाल (%)

## कनिष्ठ महाविद्यालय

| विद्याशाखा- वर्ग | वर्ष २०१४-१५ | वर्ष २०१५-१६ | वर्ष २०१६-१७ | वर्ष २०१७-२०१८ | वर्ष २०१८-२०१९ |
|---|---|---|---|---|---|
| १२ वी कला | ८९.०७ | ९०.५६ | ७९.४७ | ९५.४५ | ९२.८० |
| १२ वी शास्त्र | ९८.१३ | ९८.१० | ९८.५३ | ९८.७८ | ९८.९६ |
| १२ वी वाणिज्य | ९५.६५ | ९७.१४ | ९८.०० | ९९.१९ | ९९.२३ |
| १२ वी व्यावसायिक अभ्यासक्रम | ९४.५९ | ८६.४० | ८६.४० | ९५.४९ | ९७.२३ |

## वरिष्ठ महाविद्यालय

| विद्याशाखा वर्ग | वर्ष २०१४-१५ | वर्ष २०१५-१६ | वर्ष २०१६-१७ | वर्ष २०१७-२०१८ | वर्ष २०१८-२०१९ |
|---|---|---|---|---|---|
| बी.ए.भाग-१ | ७९.८२ | ६५.८७ | ७०.८० | ८१.३१ | ८१.५२ |
| बी.कॉम. भाग-१ | ७८.१५ | ६८.३२ | ७९.६४ | ७४.३० | ७७.९७ |
| बी.एस्सी. भाग-१ | ६२.१५ | ७६.२५ | ८३.७६ | ८२.९४ | ८७.२२ |
| बी.ए.भाग-२ | ८३.८५ | ८४.८५ | ८२.०५ | ८८.८५ | ७४.२६ |
| बी.कॉम. भाग-२ | ८९.६५ | ८१.३० | ७८.५७ | ७१.७२ | ८६.४६ |
| बी.एस्सी. भाग-२ | ९०.१० | ८६.४५ | ८७.०२ | ७०.५२ | ७७.८९ |
| बी.ए.भाग-३ | ८२.८४ | ६५.९३ | ८४.७४ | ५६.४७ | ९०.३७ |
| बी.कॉम. भाग-३ | ७९.२६ | ७६.६६ | ७१.५७ | ९१.१३ | ६१.०६ |
| बी.एस्सी. भाग-३ | ९३.७५ | ८३.१६ | ८८.०९ | ८७.४३ | ७९.७५ |
| एम.ए. भाग-१ | ६६.६६ | ८२.३९ | ७५.५३ | ७८.५७ | ४१.१७ |
| एम.ए. भाग - २ एम.एस्सी. गणित | ६५.७१ | ७५.०२ | ७१.८६ | ९१.६६ | ७४.२८ |
| रसायनशास्त्र | -- | -- | -- | -- | -- |

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**

**Certificate**

This to certify that University approval is given to **Yashwantrao Chavan Warana Mahavidyalaya, Warananagar, Dist. Kolhapur** to conduct the following courses for the academic year 2018 -19

ARTS, SOCIAL SCIENCE, COMMERCE & SCIENCE FACULT Y

**B.A. - I - Grant-in aid Division - 2 Non grant Division - 1 Permanent Affiliation**

| | |
|---|---|
| Govt.Approval | – शिविस – १०९५ / तुकड्या / (२२३/९५) मशि-३, दिनांक १२/१०/१९९५ |
| University Recent Approval | -संलग्नता/टे-२/फा-३५/८२७५, दिनांक : ३१/१२/२००२ |
| Compulsory | -इंग्रजी, मराठी, वैज्ञानिक पद्धती |
| Optional | -मराठी, हिंदी, इंग्रजी, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, इतिहास, भूगोल, शारिरीक शिक्षण ´ |

**B.A. - II - Grant-in aid Division - 2 Permanent Affiliation**

| | |
|---|---|
| Govt.Approval | - शिविस – १०९२ / ९०-९१ /४७७१/विशि-२, दिनांक १४/०१/१९९२ |
| University Recent Approval | -संलग्नता/टे-२/फा-३५/८२७५, दिनांक : ३१/१२/२००२ |
| Compulsory | -इंग्रजी, एच.एस.आर.एम., लॉजिक, पर्यावरण अभ्यास |
| Optional | - ´मराठी, हिंदी, इंग्रजी, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, इतिहास, भूगोल |

**B.A. - III - Grant-in aid Division - 1 Non grant Division - 1 Permanent Affiliation**

| | |
|---|---|
| Govt.Approval | -शिविस– १०९२ / ९०-९१ /४७७१/विशि-२, दिनांक १४/०१/१९९२ |
| University Recent Approval | -संलग्नता/टे-२/फा-३५/८२७५, दिनांक : ३१/१२/२००२ |
| Compulsory | -इंग्रजी |
| Optional | -इंग्रजी, मराठी, हिंदी, इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, समाजशास्त्र |

**B.Com. - I - Grant-in aid Division - 1 Permanent Affiliation**

| | |
|---|---|
| Govt.Approval | -शिविस – १०९२ / ९०-९१ /४७७१/विशि-२, दिनांक १४/०१/१९९२ |
| University Recent Approval | -संलग्नता/टे-२/फा-३५/८२७५, दिनांक : ३१/१२/२००२ |
| Compulsory | -बिझनेस कम्युनिकेशन-१ (इंग्रजी), बिझनेस इकॉनॉमिक्स-१, प्रिन्सीपल ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, फायनान्शियल अकौंटिंग |
| Optional | -प्रिन्सीपल ऑफ मार्केटिंग, इन्शुरन्स |

**B.Com. - II - Grant-in aid Division - 1 Permanent Affiliation**

| | |
|---|---|
| Govt.Approval | -शिविस – १०९२ / ९०-९१ /४७७१/विशि-२, दिनांक १४/०१/१९९२ |
| University Recent Approval | -संलग्नता/टे-२/फा-३५/८२७५, दिनांक : ३१/१२/२००२ |
| Compulsory | -बिझनेस कम्युनिकेशन-२ (इंग्रजी), पर्यावरण अभ्यास, फंडामेंटल ऑफ इंटरप्रिनरशिप, कार्पोरेट अकौंटिंग, बिझनेस इकॉनॉमिक्स-२, फंडामेंटल बिझनेस स्टॅटेस्टिक्स, मनी अॅण्ड फायनान्शियल सिस्टिम |
| Optional | अॅडव्हान्स अकौंन्टसी पेपर १ व २ |

**B.Com. - III - Grant-in aid Division - 1 Permanent Affiliation**

| | |
|---|---|
| Govt.Approval | -शिविस – १०९२ / ९०-९१ /४७७१/विशि-२, दिनांक १४/०१/१९९२ |
| University Recent Approval | -संलग्नता/टे-२/फा-३५/८२७५, दिनांक : ३१/१२/२००२ |
| Compulsory | - बिजनेस एन्व्हायरमेंट, बिझनेस इकॉनॉमिक्स, मॉडर्न मॅनेजमेंट प्रॅक्टीसेस, को-ऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट, बिझनेस रेग्युलेटरी फ्रमवर्क |
| Optional | - अॅडव्हान्स अकौंन्टसी पेपर १ व २ |

**B.Sc. - I - Grant-in aid Division - 1 Permanent Affiliation** Nongrant Division-2

| | |
|---|---|
| Govt.Approval | -शिविस – १०९२ / ९०-९१ /४७७१/विशि-२, दिनांक १४/०१/१९९२ |
| University Recent Approval | -संलग्नता/टे-२/फा-३५/८२७५, दिनांक : ३१/१२/२००२ |
| Compulsory | -इंग्रजी |
| Optional | -गणित, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, भूगोल, शारिरीक शिक्षण, बायोकेमिस्ट्री |

**B.Sc. - II - Grant-in aid Division - 1 Permanent Affiliation** Nongrant Division-1

| | |
|---|---|
| Govt.Approval | -शिविस – १०९२ / ९०-९१ /४७७१/विशि-२, दिनांक १४/०१/१९९२ |
| University Recent Approval | -संलग्नता/टे-२/फा-३५/८२७५, दिनांक : ३१/१२/२००२ |
| Compulsory | -पर्यावरण अभ्यास |
| Optional | - गणित, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, बायोकेमिस्ट्री |

**B.Sc. - III - Grant-in aid Division - 1 Permanent Affiliation** Nongrant Division-1

| | |
|---|---|
| Govt.Approval | -शिविस – १०९२ / ९०-९१ /४७७१/विशि-२, दिनांक १४/०१/१९९२ |
| University Recent Approval | -संलग्नता/टे-२/फा-३५/८२७५, दिनांक : ३१/१२/२००२ |
| Compulsory | -इंग्रजी |
| Optional | -गणित, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, |

**B.Sc. - I & II Non - Grant-in aid Division**

| | |
|---|---|
| Govt.Approval | - |
| University Recent Approval | -शिवाजी वि/संलग्नता/टी-२/विद्यापरिषद वि.क्र.८९, दि.२३/०१/२०१४ |
| Optional | -बायोकेमिस्ट्री |

**M.A - I & II - Non Grant Division - 1 Intake 24**

| | |
|---|---|
| Govt.Approval | -शिविस – २००६ /( १२/०६)मशि-३, दिनांक ३ जून २००६ |
| University Recent Approval | -संलग्नता/टी-२/KOP 20/ विद्यापरिषद वि.क्र.१०/ दि.१०/०४/२०१७/ जा.क्र ११८३ दि. १८ मे २०१७ |
| | -मराठी, इतिहास, अर्थशास्त्र - |

**M.Sc. - I & II Non - Grant-in aid Division** Marks Intake 50 I & II, Chemistry Intake 20 I & II

| | |
|---|---|
| Govt.Approval | -शिविस – २००६ / (१२/०६)मशि-३, दिनांक ३ जून २००६, एनजीसी-२०१७/(१०१/१७) मशि-४, दि. १/९/२०१७ |
| University Recent Approval | -शिवाजी वि/संलग्नता/टी-२/जा.क्र.११८३, दि.१८/०५/२०१७, संलग्नता/टी-२/२२९ दि. १०/०४/२०१७/५१ |
| Optional | - Maths , Chemistry |

**Place : KOLHAPUR**

DIRECTOR
Board of College & University Development

राष्ट्रीय मूल्यांकन एवं प्रत्यायन परिषद

विश्वविद्यालय अनुदान आयोग का स्वायत्त संस्थान

**NATIONAL ASSESSMENT AND ACCREDITATION COUNCIL**

*An Autonomous Institution of the University Grants Commission*

# Quality Profile

***Name of the Institution*** : Yashwantrao Chavan Warana Mahavidyalaya

***Place*** : Warananagar, Panhala, Kolhapur, Maharashtra

| *Criteria* | *Weightage* ($W_i$) | *Criterion-wise Weighted Grade Point* ($Cr\,WGP_i$) | *Criterion-wise Grade Point Averages* ($Cr\,WGP_i / W_i$) |
|---|---|---|---|
| I. *Curricular Aspects* | 100 | 300 | 3.00 |
| II. *Teaching-Learning and Evaluation* | 350 | 1050 | 3.00 |
| III. *Research, Consultancy and Extension* | 150 | 450 | 3.00 |
| IV. *Infrastructure and Learning Resources* | 100 | 350 | 3.50 |
| V. *Student Support and Progression* | 100 | 320 | 3.20 |
| VI. *Governance, Leadership & Management* | 100 | 310 | 3.10 |
| VII. *Innovations and Best Practices* | 100 | 230 | 2.30 |
| **Total** | $\sum_{i=1}^{7} w_i = 1000$ | $\sum_{i=1}^{7} (Cr\,WGP_i) = 3010$ | |

$$\textit{Institutional CGPA} = \frac{\sum_{i=1}^{7}(Cr\,WGP_i)}{\sum_{i=1}^{7} W_i} = \frac{3010}{1000} = \boxed{3.01}$$

**Grade** = **A**

*Date : March 28, 2017*

*Director*

- **This certification is valid for a period of *Five* years with effect from March 28, 2017**
- **An institutional CGPA on seven point scale in the range of 3.76 - 4.00 denotes A++ grade, 3.51 - 3.75 denotes A+ grade, 3.01 - 3.50 denotes A grade, 2.76 - 3.00 denotes B++ grade, 2.51 - 2.75 denotes B+ grade, 2.01 - 2.50 denotes B grade, 1.51 - 2.00 denotes C grade**
- **Scores rounded off to the nearest integer**

EC(SC)/23/A&A/7.3

राष्ट्रीय मूल्यांकन एवं प्रत्यायन परिषद

विश्वविद्यालय अनुदान आयोग का स्वयत्त संस्थान

# NATIONAL ASSESSMENT AND ACCREDITATION COUNCIL

**An Autonomus Lntitution of the University Grants Commission**

## Certificate of Accredition

*The executive Committee of the*
*National Assessment and Accreditation Council*
*on the recommendation of the duly appoined*
*Peer Team is pleased to declare the*

*Shree Warna Vibhaga Shikshan Manda's*

## *Yashwantrao Chavan Warana Mahavidyalaya*

*Warananagar, Dist , Kolhapur, affiliated to Shivaji University Maharashtra as,*

## *Accredited*

*With CGPA of 3.01 pm four point scale*
*at A Grade*
*valid upto March 27-2017*

NAAC

**Date : March 28,2017**

**Director**



श्री वारणा विभाग शिक्षण मंडळ, वारणानगर

संचलित संस्था

# यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय

- तात्यासाहेब कोरे अभियांत्रिकी महाविद्यालय
- तात्यासाहेब कोरे औद्योगिक प्रशिक्षण केंद्र
- तात्यासाहेब कोरे ट्रेनिंग कम प्रॉडक्शन सेंटर
- श्री वारणा विद्यामंदीर
- वारणा वायर्ड व्हिलेज प्रोजेक्ट
- तात्यासाहेब कोरे बी.एड्. कॉलेज
- तात्यासाहेब कोरे मिलिटरी ॲकॅडमी
- तात्यासाहेब कोरे इंग्लिश ॲकॅडमी
- तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फॉर्मसी
- श्री वारणा विद्यालय
- विनय कोरे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
- सावित्रीआक्का कोरे डी. एड्. कॉलेज
- तात्यासाहेब कोरे ज्ञानप्रबोधिनी प्रशाला

- स्थापना : जुन १९६४
- २ एफ मान्यता : मार्च १९६७
- निरंतन संलग्नता : डिसेंबर २००२
- नॅक पुनर्मूल्यांकन : मार्च २०१०
- शिक्षण मंडळ : (०२३२८) २२४०३०

- कार्यालय : (०२३२८) २२४०४१
- प्राचार्य कक्ष : (०२३२८) २२२८२०
- संकेत स्थळ : WWW.ycwm.ac.in
- ई-मेल : W50@unishivaji.ac.in

प्रकाशक

प्रोफेसर डॉ. प्रकाश शंकरराव चिकुर्डेकर प्र. प्राचार्य, य.च.वारणा महाविद्यालय, वारणागनर,
ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर- ४१६ ११३ (महाराष्ट्र)